# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
## Date – 14 January 2026
## Time 01.00 to 01.05 PM
## Language Marathi
## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
## प्रादेशिक बातम्या
## दिनांक १४ जानेवारी २०२६ दुपारी १.०० वा.

****

निसर्गाविषयीची कृतज्ञता केवळ शब्दांपुरती न राहता ती आपल्या जीवनशैलीचा भाग बनली पाहिजे, अशी अपेक्षा पंतप्रधान मोदी यांनी व्यक्त केली. नवी दिल्ली इथं आज केंद्रीय माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री एल मुरुगन यांच्या निवासस्थानी आयोजित पोंगल समारंभात ते बोलत होते.

दरम्यान, देशभरात आज मकरसंक्रांती मोठ्या उत्साहात साजरी होत आहे. सूर्याच्या उत्तरायणाच्या प्रारंभानिमित्त कडाक्याच्या थंडीला निरोप देत हा सण साजरा केला जातो. कृषिसंस्कृतीशी जोडलेलं हे पर्व देशातल्या विविध भागांत वेगवेगळ्या नावांनी आणि परंपरांनी साजरा करण्यात येतं. यानिमित्त शेतकऱ्यांविषयी कृतज्ञता व्यक्त करत पंतप्रधान म्हणाले –

**बाईट – पंतप्रधान नरेंद्र मोदी**

तामिळनाडूमध्ये पोंगल, गुजरातमध्ये उत्तरायण, आसाममध्ये भोगाली बिहू आणि पश्चिम बंगालमध्ये पोष संक्रांति हे सण पारंपारिक पद्धतीने उत्साहात साजरे होत आहेत.

****

भारतीय लष्कराचे पहिले कमांडर-इन-चीफ, फील्ड मार्शल के. एम. करिअप्पा यांचा वारसा आणि सेवेचा सन्मान करण्यासाठी आज सशस्त्र सेना माजी सैनिक दिन साजरा केला जात आहे. फील्ड मार्शल करिअप्पा १४ जानेवारी १९५३ रोजी सेवानिवृत्त झाले होते. हा दिवस देशभरात ३४ राज्य सैनिक मंडळं आणि ४३४ जिल्हा सैनिक मंडळांद्वारे साजरा केला जात आहे.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी यानिमित्त माजी सैनिकांना अभिवादन केलं. माजी सैनिक दिन आणि सशस्त्र दलांचा ध्वजदिन हे केवळ अभिवादनाचंच नाही, तर आपल्या शूर सैनिकांना अर्थपूर्ण पाठबळ देण्याचंही महत्त्वाचं माध्यम असल्याचं राष्ट्रपतींनी नमूद केलं.

****

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी आज नवी दिल्ली इथं १० व्या सशस्त्र सेना माजी सैनिक दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाला संबोधित केलं. माजी सैनिक हे राष्ट्रीय चेतनेचे जिवंत आधारस्तंभ, सामूहिक धैर्याचं प्रतीक आणि येणाऱ्या पिढ्यांसाठी प्रेरणेचा स्रोत असल्याचं ते म्हणाले. माजी सैनिक राष्ट्र उभारणीच्या प्रत्येक आघाडीवर योगदान देतात आणि शिस्त, नेतृत्व आणि धैर्य यासारख्या गुणांनी समाजाचं मार्गदर्शनही करतात, असंही सिंह यांनी नमूद केलं.

****

जम्मू–काश्मीरमधल्या राजौरी जिल्ह्यात काल नियंत्रण रेषा ओलांडून भारतीय हद्दीत घुसलेल्या अनेक संशयित पाकिस्तानी ड्रोनना खाली पाडण्यासाठी लष्करी सैनिकांनी गोळीबार केला. या घटनेनंतर सीमावर्ती भागातली सुरक्षाव्यवस्था अधिक कडक करण्यात आली आहे. गेल्या तीन दिवसांत जम्मू सेक्टरमधल्या सीमावर्ती भागात पाकिस्तानी ड्रोन दिसल्याच्या घटनांवर भारतीय लष्कराने पाकिस्तानच्या लष्करी कारवाई महासंचालकांकडे तीव्र आक्षेप नोंदवला आहे.

****

राज्यातल्या २९ महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठी उद्या मतदान होणार आहे. या महापालिकांमधल्या ८९३ प्रभागांमधल्या दोन हजार ८६९ नगरसेवकांसाठी ही निवडणूक होत आहे. यासाठी एकूण १५ हजार ९३१ उमेदवार रिंगणात आहेत. सकाळी साडे सात ते संध्याकाळी साडे पाच वाजेदरम्यान मतदान होणार आहे.

या मतदानासाठी उद्या संबंधित महापालिका क्षेत्रात सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. तसंच मतदारांनी आपल्यासोबत मतदार ओळखपत्र किंवा राज्य निवडणूक आयोगाने मान्यता दिलेल्या १२ पैकी कोणताही एक ओळख पुरावा सोबत ठेवणं अनिवार्य आहे. ओळख पुराव्यांमध्ये पासपोर्ट, आधारकार्ड, वाहन चालक परवाना, पॅनकार्ड आदी कागदपत्रांचा समावेश आहे.

****

महानगरपालिका निवडणुकीत नागरिकांचा सहभाग वाढवण्यासाठी जालना इथं आज भव्य तिरंगा मतदान जनजागृती रॅली काढण्यात आली. उद्या होणाऱ्या निवडणुकीत मोठ्या संख्येने नागरिकांनी सहभागी होत आपला मतदानाचा हक्क बजावावा, हा या रॅलीचा मुख्य उद्देश होता. १८० फूट लांबीच्या या तिरंगा रॅलीत नागरिकांनी मोठ्या उत्साहात आणि देशभक्तीच्या भावनेनं सहभाग घेतला.

****

छत्रपती संभाजीनगर इथं डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा नामविस्तार दिन आज साजरा होत आहे. यानिमित्त विद्यापीठ प्रवेशद्वारासमोरच्या बाबासाहेबांच्या पुतळ्याला अभिवादन करण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली आहे.

****

नाशिक जिल्ह्यात त्र्यंबकेश्वर इथं श्री संत निवृत्तिनाथ महाराज यांच्या पौष वारीनिमित्त सुमारे दोन लाख वारकरी आणि सुमारे ६०० दिंड्या दाखल झाल्या आहेत. शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्या हस्ते आज पहाटे शासकीय महापूजा झाली.

****

भारत आणि न्यूझीलंडदरम्यान तीन एकदिवसीय क्रिकेट सामन्यांच्या मालिकेतला दुसरा सामना आज राजकोट इथं खेळवला जाणार आहे. दुपारी दीड वाजता सामन्याला सुरूवात होईल.

****